महाराष्ट्र शासन
निवासी आयुक्त व सचिव यांचे कार्यालय
महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली- ११०००१

दूरध्वनी क्र. ०११-२३३८६७१२/२३३८८०७५ Email ID : arcestmahasadan@gmail.com

क्र.निआ/आस्था/५८-IV/२०२५/५६१७ दिनांक: ११.०६.२०२५

प्रति,

१. सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,
मुंबई-४०००३२.

२. सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी.

**विषय: निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या कार्यालयातील सहायक निवासी आयुक्त (संपर्क व गुंतवणूक) हे पद प्रतिनियुक्तीने भरणेबाबत.**

संदर्भ: १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का.१२, दिनांक १७.१२.२०१६.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/का.१२, दिनांक १७.०२.२०१८.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१२०/कार्या-१४, दिनांक ३१.०८.२०१७.

महोदय/महोदया,

संदर्भाधिन क्र. १ येथील दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक १६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर धोरणामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

२. उक्त शासन निर्णयास अनुसरुन, निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांचे कार्यालयाच्या आस्थापनेवरील सहायक निवासी आयुक्त (संपर्क व गुंतवणूक) (वेतनस्तर- एस-२३- रु. ६७७००-२०८७००) हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता, मंत्रालयीन विभागातील अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांकडून किंवा अवर सचिव पदाच्या समकक्ष पदावर कार्यरत क्षेत्रिय अधिकाऱ्यांमधून इच्छुकता मागविण्यात येत आहे.

३. उपरोक्त नमूद केलेले पद मंत्रालयीन अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांमधून किंवा अवर सचिव पदाच्या समकक्ष पदावर कार्यरत क्षेत्रिय अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

४. उपरोक्त पदांसाठी प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छुक अधिकाऱ्यांनी परस्पर या कार्यालयाकडे अर्ज सादर करु नयेत. त्यांनी आपापल्या विभागांमार्फत अर्ज सादर करावेत, परस्पर अर्ज सादर केल्यास त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही व त्याबाबत संबंधितांस काहीही उत्तर कळविण्यात येणार नाही.

५. सर्व संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी इच्छुक अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांचे किंवा अवर सचिव पदाच्या समकक्ष पदावर कार्यरत क्षेत्रिय अधिकाऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदीनुसार अर्जाची छाननी करुन आपल्या विभागाच्या सचिव/विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने इच्छुक संबंधित अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव सोबत जोडलेल्या प्रपत्रातील माहिती व मागील पाच वर्षांच्या परिपूर्ण गोपनीय अहवालांच्या छायांकित प्रतींसह या कार्यालयाकडे दिनांक २७.०६.२०२५ पर्यंत पोहोचतील अशा रीतीने पाठवावा.

६. एकदा निवड झालेल्या अधिकाऱ्यांचे नांव मागे घेता येणार नाही. तसेच, आपल्या विभागातून सदर पदावर प्रतिनियुक्तीसाठी जाण्यास कोणीही अधिकारी इच्छुक नसल्यास तसेही कृपया दिनांक २७.०६.२०२५ पर्यंत या कार्यालयास कळविण्यात यावे.

७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी/विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांनी सदरचे पत्र त्यांच्या विभागातील सर्व अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांच्या किंवा अवर सचिव पदाच्या समकक्ष पदावर कार्यरत क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

**( मा.निवासी आयुक्त व सचिव यांच्या मान्यतेने )**

Shelask

**( स्मिता शेलार )**
**सहाय्यक निवासी आयुक्त (प्रशासन) (प्रभारी)**

सोबत : प्रतिनियुक्तीबाबतचे विहीत प्रपत्र.

**निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांचे कार्यालयाच्या आस्थापनेवरील "सहाय्यक निवासी आयुक्त (संपर्क व गुंतवणूक)" हे पद मंत्रालयीन विभागांतील अवर सचिव संवर्गातील अधिकारी तसेच अवर सचिव पदाच्या समकक्ष पदावर कार्यरत क्षेत्रिय अधिकारी यांच्यामधून प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत**

**प्रतिनियुक्तीबाबतचे विहीत प्रपत्र**

<table>
<tr><td>१.</td><td>अधिकारी/कर्मचाऱ्याचे संपूर्ण नाव व पदनाम</td><td></td></tr>
<tr><td>२.</td><td>सध्या वेतन घेत असलेली वेतनश्रेणी</td><td></td></tr>
<tr><td>३.</td><td>जन्म दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>४.</td><td>प्रथम नियुक्तीचा दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>५.</td><td>अवर सचिव पदावरील नियुक्तीचा दिनांक/ अवर सचिव पदाच्या समकक्ष पदावर कार्यरत क्षेत्रिय अधिकारी यांचा नियुक्तीचा दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>६.</td><td>सेवानिवृत्तीचा दिनांक<br>[पहा शा.नि.दिनांक १७.१२.२०१६ मधील तरतुद ५ (ब) (६)]</td><td></td></tr>
<tr><td>७.</td><td>शैक्षणिक अर्हता</td><td></td></tr>
<tr><td>८.</td><td>भ्रमणध्वनी क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>९.</td><td>मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठऊ नयेत)</td><td></td></tr>
<tr><td>१०.</td><td>मत्ता व दायित्व सादर केली आहेत का?<br>(दिनांक ३१.०३.२०२४ रोजीचे)</td><td></td></tr>
<tr><td>११.</td><td>५०/५५ व्या वर्षी पुर्नविलोकन केले आहे का? (लागू असल्यास)</td><td></td></tr>
<tr><td>१२.</td><td>संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास त्याबाबतचा तपशील (कालावधी, पद व ठिकाण)
<table>
<tr><td>दिनांकापासून ते दिनांकापर्यंत</td><td>पद</td><td>प्रतिनियुक्तीचे ठिकाण (कार्यालय)</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
</table></td><td>प्रतिनियुक्तीचा एकूण कालावधी ..... वर्षे</td></tr>
<tr><td>१३.</td><td>संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>१४.</td><td>मागील प्रतिनियुक्तीवरुन परत आल्याच्या दिनांकापासून ३ वर्षे पूर्ण झाली आहेत का?</td><td></td></tr>
<tr><td>१५.</td><td>प्रतिनियुक्तीकरिता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे?</td><td></td></tr>
</table>